**L. C. BILL No. XXII OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA FRUIT NURSERIES AND SALE OF FRUIT PLANTS (REGULATION) ACT, 1969.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२.**

**महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक १० जुलै २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

महा.१९६९ चा ४५. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९ याच्या कलम १४ मध्ये,— १९६९ चा महा. ४५.

(१) "त्या व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर" या मजकुराने सुरू होणाऱ्या, आणि "पाच हजारापर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा करण्यात येतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"त्या व्यक्तीस, दोषसिद्ध झाल्यावर,—

(एक) पहिल्या अपराधासाठी, पंधरा हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल;

(दोन) दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधासाठी, सहा महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पंचवीस हजार रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल, अथवा या दोन्ही शिक्षा होतील;";

(२) समास टिपेतील, "शास्ती" या मजकुराऐवजी, "अपराध" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २२. ]**

**[ महाराष्ट्र फळांचे रोपमळे आणि फळांच्या रोपांची विक्री (नियमन) अधिनियम, १९६९, यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. भरत गोगावले,**
फलोत्पादन मंत्री.**]**

**(विधानपरिषदेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानसभेने दिनांक १० जुलै, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१),
महाराष्ट्र विधानसभा.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.